<u>पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या कामकाजाकरीता पद निर्मिती करण्याबाबत....</u>

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक :-पाविआ २०१८/प्र.क्र.६/वित्त आयोग कक्ष
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- २२ मे, २०१८.

<u>पहा</u> :- शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्र. राविआ-२०१७/प्र.क्र.३३/वित्त आयोग कक्ष, दि. २८ मार्च, २०१८.

<u>प्रस्तावना</u> -

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३-आय व २४३-वाय तसेच महाराष्ट्र वित्त आयोग (संकीर्ण तरतुदी) अधिनियम, १९९४ च्या तरतुदींना अनुसरून महाराष्ट्र वित्त आयोगाची स्थापना करण्यात येते. महाराष्ट्र वित्त आयोग (संकीर्ण तरतुदी) अधिनियम, १९९४ मधील कलम ३ अनुसार आयोगाची संरचना एक अध्यक्ष व सदस्य सचिवांसह चार सदस्य अशी आहे. महाराष्ट्र वित्त आयोगाने अहवाल सादर केल्यावर आयोगाचे समापन करण्यात येते. यापूर्वी स्थापित केलेल्या चौथ्या महाराष्ट्र वित्त आयोगाचे कामकाज पूर्ण झाल्यावर समापन करण्यात आले आहे. उपरोक्त अधिनियमातील तरतुदींच्या अनुषंगाने पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाची स्थापना करण्याचे प्रस्तावित होते. पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाची स्थापना करण्यास तसेच सदर वित्त आयोगाच्या कामकाजाकरिता आवश्यक पदे निर्माण करण्याचे अधिकार उच्चस्तर सचिव समितीला प्रदान करण्यास दि.३० जानेवारी, २०१८ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता मिळाली आहे. सदर मान्यतेनुसार संदर्भाधीन दि.२८ मार्च, २०१८ च्या अधिसूचनेनुसार पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली आहे.

मंत्रिमंडळाने दि.३० जानेवारी, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाचे कामकाज करण्यासाठी एकूण १८ पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समितीस मान्यतेसाठी सादर केला होता. सदर प्रस्तावास उच्चस्तरीय सचिव समितीच्या दि.१८/०४/२०१८ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता मिळाली असून सदर पदे ही नियमितपणे भरणे शक्य नसल्यास आवश्यकतेनुसार सेवानिवृत्त कर्मचा-यांमधून अथवा बाह्यस्त्रोताद्वारे अथवा समकक्ष संवर्गातून भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u>

पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या कामकाजाकरीता सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये नमूद केलेली एकूण १८ अस्थायी पदे त्यांच्यासमोर दर्शविलेल्या वेतन संरचनेनुसार निर्माण करण्यास शासन मंजूरी देत आहे. सदर पदे ही नियमितपणे भरण्यात यावी. सदर पदे नियमितपणे भरणे शक्य नसल्यास आवश्यकतेनुसार सेवानिवृत्त कर्मचा-यांमधून अथवा बाह्यस्त्रोताद्वारे अथवा समकक्ष संवर्गातून भरण्यात यावीत. सदर अस्थायी पदे ही पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाचे कामकाज पूर्ण होईपर्यंत चालू राहतील.

२. पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाने पद भरती करताना सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१२, दि.१७ डिसेंबर,२०१६ व वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.पदनि-२०१३/प्र.क्र.११२/१३/ वित्तीय सुधारणा-१, दि. २ डिसेंबर, २०१३ तसेच अनुषंगिक शासन निर्णयामध्ये विहित केलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करावा. तसेच सदर पदभरती करण्याचे अधिकार पाचवा महाराष्ट्र वित्त आयोगास राहिल.

३. उपरोक्त मंजूर केलेल्या अस्थायी पदांवरील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनावरील खर्च व भत्ते याकरीता मंजूर करण्यात येणारा खर्च मागणी क्र.जी-२, २०७०, इतर प्रशासनिक सेवा, ८०० इतर खर्च (०३)(०२) राज्य वित्त आयोग (२०७००६३९) या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात मंजूर केलेल्या तरतुदींमधून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५२३१०४२०३६००५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vandana Krishna

Digitally signed by Vandana Krishna
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0fcc377904ac87f7a5e5158674b1d40a2020cdaa95aa18dd49ffef7a9322f98b, serialNumber=88bb796a63074ccd9f97ddb710a5683f6d7ff0d85030986af2ef21e85f72c879, cn=Vandana Krishna
Date: 2018.05.23 10:42:52 +05'30'

(वंदना कृष्णा)
अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा)

प्रति,

१. राज्यपालांचे सचिव
२. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३. सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
४. मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभाग
५. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
६. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
८. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा/ विधानपरिषद), मुंबई
९. आयुक्त, राज्य माहिती आयोग, (सर्व)
१०. सर्व विभागीय आयुक्त
११. सर्व जिल्हाधिकारी
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी.
१३. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र,मुंबई.
१४. महालेखापाल-१ (लेखा परीक्षा)/ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
१५. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१८. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन ,मुंबई.
१९. विशेष आयुक्त, नवीन महाराष्ट्र सदन, कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली-११०००१.
२०. वित्त विभाग, कार्यासन- प्रशासन १, रोख, व्यय २, सेवा ५
२१. निवड नस्ती, वित्त विभाग (वित्त आयोग कक्ष)

शासन निर्णय क्रमांक :- पाविआ २०१८/प्र.क्र.६/वित्त आयोग कक्ष, दिनांक २२ मे , २०१८ चे सहपत्र
पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या कामकाजाकरीता पद निर्मिती

अ.क्र.	पदनाम	पदसंख्या	वेतनश्रेणी (रुपये)
१	सह सचिव/उप सचिव	२	३७,४००-६७,६०० ग्रेड पे ८७००/ १५६००-३९१०० ग्रेड पे ७६००
२	अवर सचिव	१	१५६००-३९१०० ग्रेड पे ६६००
३	कक्ष अधिकारी	२	९३००-३४८०० ग्रेड पे ४८००
४	सहायक कक्ष अधिकारी	२	९३००-३४८०० ग्रेड पे ४३००
५	लिपिक-टंकलेखक/देयक लेखापाल	४	५२००-२०२०० ग्रेड पे १९००
६	लघुलेखक (उच्च श्रेणी/निम्न श्रेणी इंग्रजी व मराठी)	२	९३००-३४८०० ग्रेड पे ४४००/४३००
७	सांख्यिकी अधिकारी	२	९३००-३४८०० ग्रेड पे ४४००
८	सांख्यिकी सहाय्यक	१	९३००-३४८०० ग्रेड पे ४३००
९	शिपाई	२	४४४०-७४४० ग्रेड पे १३००
	एकूण	१८	